# इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ, (आय्.पी.अेच्.) ठाणे

# IPH MIND FE(A)ST 2017

## आय.पी.एच. माइन्ड फेस्ट : उत्सव समृद्ध मनांचा

MIND FEAST

**शनिवार, ९आणि रविवार, १० डिसेंबर सायंकाळी ४.०० ते १०.००**

**स्थळ :** श्री समर्थ सेवक मंडळाचे पटांगण, श्री हनुमान व्यायामशाळा, गडकरी रंगायतन समोर, डॉ. मूस रोड, ठाणे – ४०० ६०१

---

जागतिक आरोग्य संघटनेच्या मतानुसार मनाच्या औदासिन्याची / निराशेची समस्या हा जगातील अग्रस्थानावरचा आजार बनू पहात आहे. मेंदुमधल्या जीवरासायनिक असमतोलापासून ते माणसाच्या व्यक्तिमत्वातील त्रुटीपर्यंत अनेक घटकांचा परिपाक म्हणून नैराश्याची समस्या वाढत आहे. भोवतालच्या वास्तवामध्येही अशी अनेक आव्हाने आहेत ज्यांच्या सामना करताना आपण मेटाकुटीला येतो आणि म्हणतो, आता बस्स झाला हा 'मनस्ताप ...'

नैराश्य ही भावना एकदा मनाला ग्रासू लागली की त्यातून आत्महत्येपासून ते अनाठायी आक्रमतेपर्यंतचे अनेक परिणाम संभवतात ह्याची जाणीव आपल्याला असते. वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवरही आपण प्रयत्न करत असतो, मनातील आशावाद जपण्याचा आणि अडचणींना तोंड देण्याची आपली क्षमता वाढवण्याचा. आज गरज आहे सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर, उदार मनस्क आणि मानवतावादी आशावाद पसरवणाऱ्या न-धार्मिक व्यासपीठांची.

ह्याच विचारमंथनातून आय.पी.एच. संस्थेचे कार्यकर्ते आपल्यासाठी घेऊन येत आहेत एक नवी कोरी, उमलती **Event : उत्सव समृद्ध मनांचा : MIND FEST 2017**

**FEST** म्हणजे **FESTIVAL** म्हणजे उत्सव. आम्ही ह्या शब्दाच्या मध्यभागी असलेल्या कंसामध्ये **'A'** हे अक्षरही टाकले आहे. **FEAST** म्हणजे मेजवानी! मन समृद्ध करणारी मेजवानी.

नेमके आहे काय ह्या उत्सवामध्ये ?

मानसिक आरोग्याचे अनेक पैलू आहेत. **MIND FE(A)ST** मध्ये ह्यातील प्रत्येक पैलूवर भर देणारी सत्रे खास ह्या व्यासपीठासाठी परिश्रमपूर्वक Design केलेली आहेत. 'वेध' परिषदेचा सारा फोकस असायचा करीअरवर. **MIND FE(A)ST** चा केंद्रबिंदु आहे 'समृद्ध जगण्याचा मार्ग; असे जगण्यासाठीचे प्रयत्न ... आणि त्यातले समाधान ...'

एकाहून एक सरस अशी ज्ञानरंजनाची रंजक सत्रे ...

कुटुंबातील सर्व पिढ्यांसाठी, वय वर्ष १२ ते ९२ अशा सर्वांसाठी मनआरोग्याचे विविध पैलू उलगडणारा कार्यक्रम.

'वेध'ची थेट संवादाची शैली आता एका वेगळ्या कॅनव्हासवर ...

१. **वृक्षवल्ली आम्हा...** : माणूस आणि निसर्ग ह्यातील नाते जगणारा एक माणूस... वनमहर्षी **जादाव पायांग**. थेट आसामहून आपल्याभेटीसाठी.

२. **अर्थ सौंदर्याचा** : दिल्लीहून येत आहेत **'लक्ष्मी सा'** आणि तिचे सहकारी. ॲसिड अटॅकची बळी ठरलेली लक्ष्मी स्वत: तर आयुष्यात उभी राहिलीच पण अशा मुलींसाठी तिने काढले 'SHEROS' नावाचे कॅफे.

३. **लाठी ब्रिगेड** : ग्रामीण छत्तीसगडमध्ये पुरूषांच्या व्यसनाधीनतेवर स्त्रियांना संघटित करून त्यावर तोड़गा काढणाऱ्या **पद्मश्री शमसाद बेगम** येत आहेत त्यांच्या कार्यकर्त्यांसह.

४. **खरा तो एकचि धर्म** : वाराणासीहून येत आहेत, संस्कृतचे पंड़ित व प्राध्यापक **डॉ. मोहम्मद हनीफ खान शास्त्री**. कुराण आणि भगवद गीता ह्यातील साम्यस्थळांमधून भारतीय मानवतेला नवा उजाळा देणारा विद्वान.

५. **हास्याचे वरदान तुला** : हसणे आणि हसवणे ह्यातील शास्त्र आणि कला उलगडून दाखवणारे एक खास सत्र, **संदीप पाठक** ह्या चतुरस्त्र कलाकाराच्या माध्यमातून.

६. **युद्धस्य कथा** ... : माणसाचे क्रौर्य आणि मानवतेची कसोटी ह्यांचे अनुभव; थेट येमेन आणि सिरीयाच्या युद्धभूमीवरून. 'डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स'बरोबर काम करणाऱ्या **डॉ. भरत केळकर** ह्यांची डोळ्यात अंजन घालणारी अनुभवगाथा.

७. **सूर प्रकाशाचे, सूर विकासाचे** : जपानी संगीतपद्धतीने, व्हायोलिन शिकवून, लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देणारा एक सूरमयी प्रवास घेऊन येत आहेत **रमा चोभे** आणि विविध गटातील बालक-वादक.

८. **खादीचा धागा** : खादी हे जगातील एकमेव वस्त्र असावे ज्याच्याभोवती, 'इतिहास-जीवनमूल्ये-जीवनशैली' अशा अनेक संकल्पना जोडल्या गेल्या आहेत. खादीची कहाणी सांगणार आहेत, **डॉ. उल्हास जाजू, अरूण ठाकूर** आणखी काही अफलातून माणसं.

९. **खरी दृष्टी खरे डोळे** : अंध व्यक्तींसाठी 'स्पर्शज्ञान' हे नियतकालिक चालवणारा, 'अपूर्व मेघदूत'चे नाट्यस्वप्न प्रत्यक्षात सादर करणारा **स्वागत थोरात** येत आहे आजवर कधीही न सांगितलेला त्याचा प्रवास घेऊन.

१०. **'The Marvellous Universe ऑफ फास्टर फेणे'** : कल्पनेतील व्यक्तिरेखा, तिच्या विचार- भावना-वर्तनासह आणि ह्या व्यक्तिरेखेच्या निर्मात्यासह सादर करणे हा एक नवीनच प्रयोग. आपल्याकडे येत आहेत 'फास्टर फेणे'ची टीम, ह्या प्रयोगाची कहाणी घेऊन.

---

**मर्यादित आसनसंख्या. प्रवेशिकांसाठी त्वरा करा!**

❖ खुर्ची-रुपये तीनशे (दोन्ही दिवसांसाठी) ❖ भारतीय बैठक-रुपये दोनशे (दोन्ही दिवसांसाठी)

**प्रवेशिकांसाठी संपर्क साधाः**

❖ आय्.पी.अेच्. : श्री गणेश दर्शन, ९वा मजला, तीन पेट्रोल पंप जवळ, पांचपाखाडी, ठाणे (प.)-४०० ६०२

❖ मॅजेस्टिक बुक स्टॉल, राम मारुती रोड, ठाणे (प.)

❖ चिंतन क्लासेस, टिळक चौक, कल्याण (प.)

**प्रवेशिकांसाठी माहिती : मोबाईल नं. ९८७०११५६९३ / ९८७०६०००९८ (सकाळी ११ ते संध्या.६ पर्यंत)**